# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### ईगल सिक्युरिटी अॅण्ड पर्सनल सर्व्हिसेस अंधेरी, मुंबई येथील अकॉऊटंट कम डाटा एंन्ट्री ऑपरेटर्स यांना गेल्या अनेक महिन्यांचा पगार देण्यात आला नसल्याबाबत

**(१) १४०९ (२३-१२-२०१४). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ईगल सिक्युरिटी अॅण्ड पर्सनल सर्व्हिसेस अंधेरी, मुंबई येथील अकॉऊटंट कम डाटा एंन्ट्री ऑपरेटर्स यांना गेल्या अनेक महिन्यांचा पगार देण्यात आला नसल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(३) तदनुसार उक्त कर्मचा-यांना तातडीने वेतन देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०७-२०१६) :**(१)अंशत: खरे आहे.

मे.ईगल सिक्युरिटी अँण्ड पर्सनल सर्विसेस या सेवापूरवठादाराने नियुक्त केलेल्या काही अकाऊन्टंट कम डाटा एन्ट्री आँपरेटर यांना एप्रिल, २०१४ पर्यंत वेतन अदा केले असल्याचे कळविले आहे. परंतु मे, २०१४ पासून अकाऊन्टंट कम डाटा एन्ट्री आँपरेटर यांना वेतन अदा केलेले नाही.

(२) व (३) अखिल भारतीय एडीईओ संघटना परिसंघ व मे.ईगल सिक्युरिटी अँण्ड पर्सनल सर्विसेस, मुंबई यांच्या अधिकाऱ्यांसोबत दि.३१.१.२०१५ रोजी आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फत मिळालेल्या हजेरीपत्रकामध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी असल्याचे सेवापूरवठादारांनी नमूद केले. त्यामुळे जिल्हास्तरावर समिती गठीत करुन सर्व हजेरीपत्रकांची पडताळणी करुन सुधारीत हजेरीपत्रक लवकरात लवकर राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्षाकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार जिल्हास्तरावर समिती गठीत करुन माहे फेब्रुवारी २०१४ ते जानेवारी २०१५

ची हजेरी पडताळणी करण्यात आली, सुधारीत हजेरीपत्रकांनुसार सेवापूरवठादारास अदा करावयाच्या देयकापेक्षा दंडाची रक्कम जास्त असल्याचे दिसून आले.

दरम्यानच्या काळात सदर सेवापूरवठादाराने निविदेतील काही अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे दि.१ ऑक्टोबर, २०१४ पासून त्यांचा करार रद्द करण्यात येत असल्याबाबत कळविण्यात आले. यावर सेवापूरवठादारने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आर्ब्रीट्रेशन याचिका दाखल केली असून सदर याचिकेस अनुसरुन मा.उच्च न्यायालयाने सेवापूरवठादाराविरुध्द करण्यात येणाऱ्या कार्यवाहीस स्थगिती दिली आहे. सदर याचिकेसंदर्भातील कार्यवाही मा.उच्च न्यायालयामध्ये प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या ग्रामीण भागामध्ये आशा कर्मचा-यांचे वेतननिश्चिती करुन मानधन देण्याबाबत**

**(२) २०६८ (२२-१२-२०१४). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या ग्रामीण भागामध्ये गरोदर माता लहान मुले यांची काळजी घेणे, त्यांना आहार व आरोग्याविषयी जागृती करणे, साथीच्या रोगांचा सर्व्हे करणे इ.कामाकरीता शासनाने दर एक हजारी लोकसंख्येमागे एक आशा कर्मचारी या प्रमाणे कोल्हापूर जिल्हयामध्ये २७०० महिलांची नेमणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेळेवर न मिळणारे मानधन व दरमहा वेतननिश्चिती नसल्याने कर्मचा-यांनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुन आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील “आशा” कर्मचा-यांची वेतननिश्चिती करुन वेळेवर मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. कोल्हापूर जिल्हयांमध्ये २७७३ आशा स्वयंसेविकेची पदे मंजूर असून त्यापैकी २६५७ आशा स्वयंसेविका कार्यरत आहे.

(२) हे खरे आहे.

(३) आशा स्वयंसेविका नियमित कर्मचारी नसल्याने त्यांना दरमहा वेतन व वेतननिश्चिती देणे अपेक्षित नाही. त्यांना नेमून दिलेल्या कामाच्या बाबींवर मोबदला दिला जातो. सर्व आशा स्वयंसेविकांचा मोबदला दरमहा ५ तारखेपर्यंत ई-बॅंकीगद्वारे त्यांच्या खात्यात जमा करण्याची व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली आहे.

---

**राज्यातील आरोग्य उपकेंद्रात नवजात शिशु काळजी केंद्र सुरु करण्याबाबत**

**(३) १३२८४ (०८-०४-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवजात अर्भक मृत्यू, बालमृत्यू, मातामृत्यूदर नियंत्रणाकरीता राज्यातील आरोग्य उपकेंद्रात नवजात शिशु काळजी केंद्र सुरु करण्याबाबत दिनांक ११ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान मा.आरोग्यमंत्री यांनी घोषणा केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नवजात शिशु काळजी केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही सद्यस्थिती केली आहे,
(३) सदर केंद्र सुरु होण्यास शासनास किती खर्च येणार असून केंद्र सुरु करण्यास किती कालावधी लागेल,
(४) अद्याप, याबाबत कोणती कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०७-२०१६)** :(१), (२) व (३) मा.मंत्री (आरोग्य) यांनी अशा स्वरुपाची कोणतीही घोषणा केलेली नाही. राज्यात दरमहा खालीलप्रमाणे प्रस्तुती होणाऱ्या ठिकाणी नवजात शिशुची काळजी घेण्यासाठी “नवजात शिशु काळजी कोपरे” (New Born Baby Corners - NBBC) स्थापन करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | आरोग्य संस्था | प्रसुती संख्या |
|---|---|---|
| १ | उपकेंद्र | ३-९ |
| २ | प्राथमिक आरोग्य केंद्र | १०-४९ |
| ३ | ग्रामीण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय | ५०-९९ |
| ४ | जिल्हा रुग्णालय | १०० पेक्षा जास्त |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### किनवट तालुक्यातील वनजमिनीवर झालेले बेकायदेशीर अतिक्रमण

**(४) १४५८९ (०८-०५-२०१५). श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनवट तालुक्यातील हजारो हेक्टर वनजमिनीवर वृक्षतोडून बेकायदेशीरपणे अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्षानुवर्षे वनजमिनीवर कास्त करणा-यांना वनविभागाने त्यांच्या हक्काचे पट्टे दिले परंतु अशापैकी त्यांच्या जमिनीवर अतिक्रमण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अतिक्रमण करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, वनजमिनीवरील अतिक्रमित जंगल संपत्ती नष्ट होऊ नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे सदर अतिक्रमणे रोखण्याकरिता उपवनसंरक्षक कार्यालय (किनवट) येथे कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०७-२०१६) :**(१) नांदेड वन विभागांतर्गत किनवट तालुक्यातील मांडवी, किनवट, बोधडी, इस्लापूर व अप्पारावपेठ या वनपरिक्षेत्रात मागील तीन वर्षात वनजमिनीवर बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि, पूर्वीपासून ७६९ अतिक्रमकांनी ३५७.६० हे.आर वन क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे.

(२) किनवट तालुक्यातील मांडवी किनवट बोधडी इस्लामपूर व अप्पारावपेठ या वनपरिक्षेत्रात अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्काची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत ३२४ वैयक्तिक दावे ४०१.८५८ हे.आर क्षेत्रावर मंजूर दाव्यांव्यतिरिक्त इतर कोणतेही अतिक्रमण झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) किनवट मुख्यालयी शासनाने दोन सहा. वनसंरक्षक (वर्ग-१) व किनवट तालुक्यात पाच वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक, एक वनपरिक्षेत्र अधिकारी, फिरते पथक व एक वनपरिक्षेत्र अधिकारी स्ट्राईक फोर्स व इतर क्षेत्रीय वनकर्मचारी/अधिकाऱ्यांमार्फत वनसंरक्षण व वनजमिनीवरील अतिक्रमणे रोखणे इत्यादी कामे करुन घेतली जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील वारंगा मसाई येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील राष्ट्रीय जंतुनाशक मोहीमेबाबत**

**(५) १५४१७ (०९-०४-२०१५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी तालुक्यातील जि.हिंगोली वारंगा मसाई येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत राष्ट्रीय जंतुनाशक कोटीने अंतर्गत गोळया दिल्यानंतर ८५ विद्यार्थ्यांना मळमळ व उलटयांचा त्रास होऊन एक विद्यार्थी मृत झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली आहे,

(३) याबाबत अद्यापही चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वारंगा मसाई, तालुका कळमनुरी, जि.हिंगोली येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील एकूण ८५ विद्यार्थ्यांना राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेअंतर्गत दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी जंतनाशक गोळ्या देण्यात आल्या होत्या. त्यापैकी ३४ विद्यार्थ्यांना मळमळ, उलटी, डोकेदुखी व त्वचेवर पुरळ असे प्रकार आढळून आल्याने त्यांच्यावर त्वरीत उपचार करण्यात आले. सदर घटनेमध्ये एकाही विद्यार्थ्यांचा मृत्यु झालेला नाही. तथापि, हिंगोली जिल्ह्यातील औंढा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, लोहरा, सिध्देश्वर या गावात अंगणवाडी केंद्रामधून १ वर्ष ८ महिने वयाच्या मुलीस जंतनाशक गोळी दिल्यानंतर गोळी घशात अडकून तीचा मृत्यु झाला. यानंतर त्याच दिवशी तालुकाआरोग्य अधिकारी व वैद्यकीय

अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देऊन चौकशी केली. त्यानंतर संचालक, आरोग्य यांनी राज्यात कोठेही अशा प्रकारची घटना घडू नये याबाबत सर्व संबधितांना पुन:श्च सूचना दिल्या. प्रधान सचिव (आरोग्य विभाग) यांनी संबधित पिडीताचे पालक व अंगणवाडी कार्यकर्ती यांची भेट घेऊन सदर घटनेची चौकशी केली व भविष्यात अशा घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याबाबत दक्षता घेण्याबाबत महिला व बालविकास विभागास विनंती केली. त्याचप्रमाणे यापुढे केंद्र शासनाच्या योजनेनुसार जंतनाशक गोळ्यांऐवजी syrup उपलब्ध करुन देण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी व उपमुख्य कार्यकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद, हिंगोली यांनी चौकशी केली आहे. त्यानुसार सदर प्रकरणाशी संबंधित अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांना सेवेतून कार्यमुक्त करण्यात आले आहे. मृत मुलीच्या शवविच्छेन अहवालात मृत्यूचे कारण cardio-respiratory arrest due to choking असे नमूद केले आहे. तसेच सदर औषधीचे नमुने औषध निरिक्षक यांनी तपासून दिले असून औषधी स्टँडर्ड यांनी तपासून दिले असून अहवालात म्हटले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियांनातर्गत काम करणाऱ्या कामगारांना**
**कामगार कायद्यानुसार सवलती देण्याबाबत**

**(६) १८५०४ (१७-०८-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियांनातर्गत राज्यात गेली १० वर्षे शहरी, ग्रामीण विभागात कंत्राटी पध्दतीवर, निवासी डॉक्टर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, परिचारीका, लेखापाल डाटा एंट्री ऑपरेटर आदि कर्मचारी वर्ग कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांना कामगार कायद्यानुसार देय असलेल्या सवलती अद्याप मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामगारांना कायद्यानुसार सवलती न देण्याची सर्वसाधारण कारणे कोणती,

(४) असल्यास, सदरहू कामगारांना कामगार कायद्यानुसार सवलती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०७-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर योजना मर्यादित कालावधीसाठी कार्यान्वित राहणार असून त्यानुसार केंद्र शासनाने सदर योजनेस सन २०१७ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे सदर योजने अंतर्गत मर्यादीत कालावधीसाठीच मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने विविध घटकामार्फत कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते.

(२) व (३) सदर योजना मर्यादित कालावधीसाठी कार्यान्वित राहणार असल्याने त्यासाठी कामगार कायद्यानुसार कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करणे अपेक्षित नाही. यास्तव कंत्राटी तत्वावरील कर्मचाऱ्यांना कामगार कायद्यानुसार सवलती देणे अपेक्षित नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी भागात सिकलसेल ह्या आजारावर संशोधन केंद्र उभारण्याबाबत**

**(७) २२५०४ (१७-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिकलसेल हा आदिवासी भागात सार्वत्रिक जीवघेणा आजार आहे व या रोगावर कोणतेही औषध वा उपचार पध्दती नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत आरोग्य विभागाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या
(३) तसेच यासाठी शासनाकडून संशोधन केंद्रे उभारणे अथवा समुपदेशन केंद्रे उभारणे प्रस्तावित आहे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०७-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे.

सिकलसेल आजार हा अनुवंशिक स्वरुपाचा असून हा आजार आदिवासी भागातील काही जाती-जमातींमध्ये आढळून आलेला आहे. यामध्ये लाल रक्तपेशी आपला गोल आकार बदलून कोयत्याच्या आकारात होतात. यामुळे रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा निर्माण होतो. अवयवांना पुरेसा ऑक्सीजन न मिळाल्याने अवयव निकामी होतात, सांधे दुखतात व संसर्ग होतो. या रोगावर सद्यस्थितीत कोणतेही कायमस्वरुपी औषध व उपचार उपलबध नसून या रोगाचे निदान झाल्यानंतर आवश्यकतेनुसार रक्त संक्रमण व उपचारात्मक औषधी दिली असता या आजाराची तिव्रता कमी होऊन रुग्णाचे आयुष्यमान वाढत असल्याचे आढळून आले आहे.
(२) सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सन २००८ पासून राज्यातील २१ जिल्हयातील ग्रामीण / उपजिल्हा / जिल्हा स्त्री शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सिकलसेल आजाराची प्राथमिक चाचणी (सोल्युबिलीटी चाचणी) केली जाते. सदर चाचणी सकारात्मक आलेल्या रक्ताच्या नमुन्यांची इलेक्ट्रोफोरेसीस व एच.पी.एल.सी. चाचणी नंतर निश्चित निदान करण्यात आलेल्या सिकलसेल रुग्णांना फॉलिक ॲसिड, व्हिटॅमीन-सी व प्रासंगिक आजारावरील औषधोपचार, गरज भासल्यास रक्त संक्रमण व दर तीन महिन्यांनी KFT, LFT, CBC व इतर आवश्यक रक्त चाचण्या करण्यात येतात. तसेच, आवश्यकता भासल्यास वरिष्ठ तज्ञांकडून टेलिमेडीसीनद्वारे मार्गदर्शन घेण्यात येवून औषधोपचार करण्यात येतो.
(३) ICMR द्वारे चंद्रपूर येथे सिकलसेल संशोधन केंद्र उभारण्याचे कार्य प्रगतीपथावर आहे.

---

**लाखांदूर, साकोली, लाखनी (जि.भंडारा) या तिन्ही तालुक्यांना नक्षलग्रस्त घोषित करुनही कर्मचाऱ्यांना विशेष नक्षलग्रस्त भत्ता देण्यापासून वंचित ठेवल्याबाबत**

**(८) २४६२३ (१२-०८-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य कास्ट राईट कर्मचारी कल्याण महासंघ जि.शाखा भंडारा यांनी दिनांक २९ मे, २०१५ रोजी मा.अर्थमंत्री यांना एनआरएचएम अंतर्गत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना विशेष नक्षलग्रस्त भत्ता लागू करण्याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर, साकोली, लाखनी या तिन्ही तालुक्यांना नक्षलग्रस्त घोषित करुनही शासनाच्या आदेशानुसार विशेष नक्षलग्रस्त भत्ता दिले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांना विशेष नक्षलग्रस्त भत्ता नियमित दिला जात असतांना भंडारा जिल्ह्यातील उपरोक्त तालुक्यांतील कर्मचाऱ्यांना विशेष नक्षलग्रस्त भत्ता देण्यापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०७-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे.

(२) हे खरे आहे.

भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर साकोली व लाखनी या तिनही तालुक्यातील कार्यरत कंत्राटी आरोगय सेविका, स्टाफ नर्स व एलएचव्ही यांना नक्षलग्रस्त भत्त्यासह मानधन अदा केले जात नाही.

(३) व (४) गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागातील कार्यरत कंत्राटी आरोग्य सेविका, स्टाफ नर्स व एचएलव्ही यांना प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यास केंद्र शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार नक्षलग्रस्त भत्त्यासह मानधन अदा करण्यात येते.

भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर, साकोली, लाखानी या तालुक्यांमधील उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कार्यरत एएनएम, स्टाफ नर्स व एलएचव्ही यांना नक्षलग्रस्त भत्त्यासह मानधन अदा करण्याकरीता आवश्यक अतिरिक्त अनुदानाची मागणी सन २०१५-१६ च्या पुरवणी वार्षिक कृती आराखड्यामध्ये करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार अनुदन प्राप्त होताच उक्त तालुक्यांतील एएनएत, स्टाफ नर्स व एलएचव्ही यांना नक्षलग्रस्त भत्त्यासह मानधन अदा करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिमोफिलीया बाधीत रुग्णांना उपचारासाठी प्रवासात सवलत मिळणेबाबत**

**(९) २५३३४ (१२-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिमोफिलीया बाधीतांना उपचारासाठी मोफत एस.टी.प्रवास सवलत देण्याबाबत शासनाने सन २०१३-१४ मध्ये निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही या संदर्भात अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हिमोफिलीया बाधीतांना उपचारासाठी मोफत एस.टी.प्रवास सवलत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०६-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

राज्यातील सिकलसेलग्रस्त रुग्णास त्याच्या उका मदतनीसासह शासकीय दवाखान्यात उपचाराकरीता ये-जा करण्याकरीता मोफत एस.टी. प्रवास योजनेस दिनांक १० मार्च, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. ही योजना हिमोफिलीया बाधीत रुग्णांना लागू करण्यात आलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१०) २९०६९ (२१-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील मंजूर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या १६७ पदापैकी ४९ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच रिक्त असलेल्या पदांमुळे शाहुवाडी, पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, चंदगड, आजरा, गडहिंग्लज या डोंगरी तालुक्यातील आरोग्य सुविधांचा अभाव आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच रुग्णांना वेळेत उपचार न मिळाल्याने रुग्ण दगावल्याचे प्रकार अनेक वेळा घडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सदरची रिक्त पदे तातडीने भरणेबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०७-२०१६) :**(१) अंशतः खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची राज्यस्तरीय ८३ पदे मंजूर असून त्यापैकी ७५ पदे भरलेली आहेत व ८ पदे रिक्त आहेत. तर जिल्हास्तरीय १६७ पदे मंजूर असून त्यापैकी १२८ पदे भरलेली आहेत व ३९ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

शाहूवाडी, पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, चंदगड, आजरा व गडहिंग्लज या डोंगरी तालुक्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | आरोग्य संस्था | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | उप जिल्हा रुग्णालय, गडहिंग्लज | १२ | १२ | ० |
| २ | उप जिल्हा रुग्णालय, कोडोली | ७ | ५ | २ |
| ३ | ग्रामीण रुग्णालय, पन्हाळा | ३ | ३ | ० |
| ४ | ग्रामीण रुग्णालय, मलकापूर | ३ | २ | १ |
| ५ | ग्रामीण रुग्णालय, नेसरी | ३ | २ | १ |
| ६ | ग्रामीण रुग्णालय, राधानगरी | ३ | ३ | ० |
| ७ | ग्रामीण रुग्णालय, सोळांकूर | ३ | २ | १ |
| ८ | ग्रामीण रुग्णालय, चंदगड | ३ | ३ | ० |
| ९ | ग्रामीण रुग्णालय, आजरा | ३ | २ | १ |
| १० | ग्रामीण रुग्णालय, गगनबावडा | ३ | २ | १ |
| | एकूण | ४३ | ३६ | ७ |

वर नमूद केल्याप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्यातील डोंगरी भागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरलेली असून त्यांच्यामार्फत तेथील भागातील जनतेला रुग्णसेवा देण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

अशा प्रकारची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे नियमित स्वरुपात नामनिर्देशनाने आणि मुलाखतीद्वारे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. जिल्ह्यामध्ये विशेष बाब म्हणून सदर पदे अस्थायी स्वरुपात भरण्यास तसेच जिल्हा स्तरावर "वॉक-इन-इंटरव्हयू" द्वारे कायमस्वरुपी भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

---

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य (एन आर एच एम) च्या अंतर्गत बालविकास केंद्रामधील पोषण आहार योजनेसाठीचा निधी केद्र शासनाने बंद केल्याबाबत**

**(११) ३०६८८ (२१-०१-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मेळघाट या कुपोषीत भागातील बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी राज्य शासनाला केंद्र शासनाकडून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (एन.आर.एच.एम.) अंतर्गत ग्राम बाल विकास केंद्रामधील पोषक आहार योजनेसाठीचा निधी केंद्र शासनाने बंद केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्याच्या कुटूंब कल्याण विभागाने जिल्हापरिषद आरोग्य अधिकाऱ्यांसह प्राथमिक आरोग्य केंद्रांनाही सप्टेंबर, २०१५ पासून सदर योजना बंद करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उपरोक्त निर्णयामुळे, जीवन मृत्यूंच्या सीमा रेषेवर असलेल्या राज्यातील ३० हजाराहून अधिक बालकांना याचा फटका बसल्याने त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आहे व त्यानुसार कुपोषित बालकांच्या मृत्यूला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती पर्यायी उपाय योजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०७-२०१६)** :(१) हे खरे आहे.

सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये ग्राम बालविकास केंद्राकरीता राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत कृती आराखड्यामध्ये अनुदानाची मागणी करण्यात आली होती. तथापि, केंद्र शासनाने दि.१२ ऑगस्ट, २०१५ च्या पत्रान्वये ग्राम बाल विकास केंद्राकरीता सप्टेंबर, २०१५ पासून अनुदानास मंजुरी नसल्याने कळविले आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाकडून प्राप्त सूचना नुसार दि.१४ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यास ग्राम बाल विकास केंद्र बंद करण्याच्या सुचना राज्य कुटुंब कल्याण कार्यालयामार्फत देण्यात आल्या होत्या. तथापि, दि.३ डिसेंबर, २०१५ च्या पत्रान्वये जिल्हयांमध्ये कार्यान्वित असलेल्या जिल्हा नियोजन समिती, सी. एस. आर, लोक वर्गणी, बालक दत्तक योजना, आदिवासी उपाययोजना, १३ वा वित्त आयोग इत्यादी यंत्रणा व कार्यक्रम यांच्या मार्फत पर्यायी निधी उपलब्ध करुन घेवून ग्राम बाल विकास केंद्र कार्यान्वित ठेवण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार माहे ऑगस्ट, २०१५ अखेर एकूण ३०५७९ सॅम/मॅम बालकांपैकी ८३३८ सॅम मॅम बालकांवर बालविकास केंद्रामध्ये उपचार करण्यात आला व ६४६१ बालकांचे श्रेणीवर्धन झाले.

राज्यातील अमरावती, नंदूरबार, धुळे, चंद्रपूर, पुणे, सातारा व वर्धा या जिल्हयात माहे सप्टेंबर, २०१५ पासून इतर निधीतून ग्राम बालविकास केंद्र चालू आहेत.

१३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून बाल उपचार केंद्रासाठी रु.३३४.८० लक्ष इतके अनुदान मंजूर करण्यात आले असून दि.१६/११/२०१५ पासून फेब्रुवारी, २०१६ अखेर ३६६ कुपोषित बालकांना दाखल करुन उपचार करण्यात आला आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पोषण पुनर्वसन केंद्रांना सन २०१५-१६ मध्ये ९९.९० लक्ष इतका निधी मंजुर असून २१७६ बालकांवर माहे डिसेंबर अखेर पर्यंत उपचार करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हा आशा वर्कस युनियनच्या वतीने जिल्हापरिषदेवर आशा व गटप्रवर्तकांना सेवेत कायम करण्याबाबत

**(१२) ३५२१८ (२१-०१-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हा आशा वर्कस युनियनच्या वतीने जिल्हापरिषदेवर आशा व गटप्रवर्तकांना सेवेत कायम करुन व आरोग्य सेविकेचा दर्जा व विविध मागण्यांकरिता दिनांक ५ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या सुमारास मोर्चा काढला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या युनियनच्या मागण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०७-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) सदर संस्थेच्या निवेदनातील मुद्यांबाबत मुद्येनिहाय पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

१) आशा व गटप्रवर्तकांना सेवेत कायम करुन आरोग्य सेविकेचा दर्जा कायम करा.

२) गटप्रवर्तकांना महिना १५ हजार आशांना १० हजार महिना द्या :-

आशा स्वयंसेविकेस व गटप्रवर्तकांस केंद्र शासनाने दिलेल्या मंजूरीनुसार ४८ प्रकारच्या कामावर आधारीत मोबदला अदा करण्यात येतो. त्यांना सेवेत कायम करुन आरोग्य सेवीकेचा दर्जा देणे अपेक्षित नाही. यास्तव त्यांना कोणत्याही स्वरुपात मानधन देणे शक्य नाही.

३) विनामोबदला काम देणे बंद करा :-

४) गोवर बुस्टर थकित मानधन

आशा स्वयंसेविकेने ० ते १ वर्षापर्यंतच्या बालकांना पुर्ण लसीकरण केल्यास रु.१००/- प्रती बालक व १ ते २ वर्षाच्या बालकांना लसीकरण पुर्ण केल्यास रु.५०/- प्रती बालक याप्रमाणे मोबदला अदा करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

५) एच.बी.एन.सी. स्टेशनरी व झेरॉक्स खर्च द्या.

आशा स्वयंसेविकेस एच.बी.एन.सी. बुकलेट तसेच केलेल्या कामाची नोंद करण्यासाठी डायरी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

६) सॉफ्टवेअर एंन्ट्री भत्ता १ हजार मिळाला पाहिजे :-

केंद्र शासनाने प्रकल्प अमंलबजावणी आराखड्यात प्रती गटप्रवर्तक रु.२५०/- याप्रमाणे सॉफ्टवेअर डेटा एंन्ट्री करण्याकरीता तरतूद मंजूर केलेली आहे. सदर मंजूरीनुसार मोबदला अदा करण्यात येत आहे.

७) आशा व गटप्रवर्तक यांचे थकित मानधन मिळाले पाहिजे :-

आशा स्वयंसेविकांचे थकित मानधन अदा करण्याबाबत संबंधितांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

८) निवडणूक लढवण्याबाबत आशाच्या बाबतचा आदेश रद्द करा :-

याबाबत नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.

९) आशा व गटप्रवर्तक यांच्या मोबाईल भत्ता रु.५००/- करा :-

आशा स्वयंसेविका गटप्रवर्तक याना दरमहा रु.५०/- याप्रमाणे वार्षिक याप्रमाणे रु.६००/- इतका मोबदला भत्ता आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांना अदा करण्यात येत आहे.

१०) आशा चा मासीक भत्ता रु.५००/- करा :-

दरमहा रु.१५०/- याप्रमाणे मासीक सभेस उपस्थित राहण्याकरीता आशा स्वयंसेविकेस मासीक भत्ता अदा करण्यात येत आहे.

११) चिरायु योजनेवरील अनुदान दुप्पट करुन सर्व आशा ना सरसकट मोबदला द्या :-

चिरायु योजने करीता जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे कडून निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तरी, अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याबाबत जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना विनाप्रस्ताव देण्यात आला आहे.

१२) आशा संजिवनी योजनेतील अनुदान दुप्पट करा :-

आशा संजिवनी योजने करीता जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे कडून निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तरी, अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याबाबत जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना प्रस्ताव देण्यात आला आहे.

१३) आशा सह कुटुंबासह मेडिक्लेम योजना लागु करा :-

सदर विनंती अमान्य करण्यात आली आहे.

१४) तालुका, प्रा. आ. केंद्र पातळीवरील स्थानिक समस्या सोडविण्यासाठी संयुक्त बैठकांचे आयोजन :-

दरमहा प्रा.आ.केंद्र स्तरावर आशा स्वयंसेविकेची मासिक सभा घेण्यात येत आहे. सदर सभेत प्रशिक्षण, आढावा तसेच आशा स्वयंसेविकेच्या समस्येबाबत चर्चा करण्यात येते.

१५) वेळोवेळी सर्वसमावेश मेडिकिट पुर्नभरण करुन मिळाले पाहिजे :-

आशा स्वयंसेविकेस प्रा.आ.केंद्र/उपकेंद्र स्तरावरुन औषधांची पुनर्भरणी करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

१६) प्रा.आ. केंद्र पातळी व लैगिक छळ प्रतिबंधक समितीची स्थापना करा :-

कोल्हापूर जिल्हयांतील सर्व तालुक्यांत लैगिक छळ प्रतिबंधक समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील ७३ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी १५ हून अधिक ठिकाणी डॉक्टरच उपलब्ध नसल्याबाबत**

**(१३) ३५२६९ (२१-०१-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील ७३ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी १५ हून अधिक ठिकाणी डॉक्टरच उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात जवळपास ५० हून अधिक डॉक्टरांची पदे रिक्त आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरची रिक्त केव्हापर्यंत भरण्याचे शासनास अपेक्षित आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ७३ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित आहेत. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची प्रत्येकी २ पदे मंजूर आहेत. त्यानुसार एकूण १४६ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदांपैकी १०० स्थायी, ७ अस्थायी व ८ बंधपत्रिक वैद्यकीय अधिकाऱ्यांसह ११५ पदे भरलेली आहेत. यापैकी ८ प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या ठिकाणी स्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थांमध्ये जिल्हास्तरावर १६७ पदे मंजूर असून राज्य स्तरावर ८९ पदे मंजूर आहेत. यापैकी जिल्हास्तरावर १२८ पदे भरलेली असून ३९ पदे रिक्त आहेत. तर राज्य स्तरावर ८३ पदे भरलेली आहेत व ६ पदे रिक्त आहेत.

(३) राज्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांचे राजीनामे, सेवानिवृत्ती, स्वच्छासेवानिवृत्ती, अनधिकृत गैरहजेरी, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्ती किंवा अध्ययन रजा यासारख्या कारणांमुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत.

(४) वैद्यकीय अधिकऱ्यांची रिक्त पदे मुलाखतीद्वारे नामनिर्देशनाने समुपदेशनामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**गोंदिया जिल्हयातील मौजा सुर्यटोला येथील बांध तलावावरील अतिक्रमण हटविण्याबाबत**

**(१४) ३५६१९ (१५-०१-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा सुर्यटोला येथील बांध तलावाच्या ८० एकराच्या परिसरामध्ये भुमाफियांनी अतिक्रमण करुन तसेच त्या जागेचे रुपांतरण अकृषक करुन विक्रीकरीता प्लॉट्स पाडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जागेवरील अतिक्रमण हटवणे व बेकायदेशीरपणे सदरहू जागेचे रुपांतरण अकृषक करण्यामध्ये सहभागी अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी या करिता परिसरातील नागरिकांनी आंदोलने केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू जागेवरील अतिक्रमण हटविण्याबाबत व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१६) :**(१) होय हे  खरे आहे.

या तलावाच्या बुडीत क्षेत्रातील खाजगी जमिनीवर अकृषक करुन प्लॉट पाडलेले आहेत. पावसाळ्यामध्ये तलाव पूर्ण क्षमतेचा भरल्यानंतरही सर्व पाडलेले प्लॉटस् पाण्याखाली येतात या अकृषण केलेल्या प्लॉटची एन.ए. रद्द करण्याकरिता परिसरातील नागरीकांनी मागणी केलेली आहे व यावर उपविभागीय अधिकारी, (राजस्व) गोंदिया कार्यालयाने दिनांक ९/२/२०१६ चे आदेशान्वये २.४२ हेक्टर जमिन अकृषक दर्जा रद्दबादल ठरविण्यात येवून, तहसिलदार गोंदिया व नगर विकास प्राधिकरण, नगर परिषद गोंदिया यांना अभिलेख्यात नोंद घेण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जननी शिशु सुरक्षा योजनेअंतर्गत गडचिरोली जिल्ह्यात सेवा दिलेल्या रुग्णवाहिकांच्या थकीत देयकांबाबत

**(१५) ३८३३७ (२१-०१-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या एन.आर.एच.एम. अंतर्गत जननी शिशु सुरक्षा योजना संपूर्ण महाराष्ट्रभर राबविते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली सारख्या दुर्गम भागातही ही योजना प्रभावीपणे राबविली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेचा खर्च नियमितपणे शासन स्तरावरून दिल्या जातो, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच या योजनेत सेवा देणाऱ्या संस्थेची माहे ऑक्टोबर, २०११ पासूनची देयके अजूनपर्यंत थकीत आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, थकीत देयके देण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.

शासनामार्फत जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम हा दिनांक २६ सप्टेंबर, २०११ चया शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये दिनांक ७ ऑक्टोबर, २०११ पासून राबविण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

जननी शिशु सुरक्षा योजनेच्या माध्यमातून गरोदर मातेला प्रसूती पूर्व व प्रसुती पश्चात ४२ दिवसापर्यंत तसेच नवजात बालकाला सर्व सेवा, औषधे, तपासण्या, रक्तपुरवठा व उपचार मोफत दिले जातात. संदर्भ सेवेकरीता १०८ या टोल फ्रि नंबरवर संपर्क केल्यास मोफत वाहन सेवा उपलब्ध करुन दिली जाते.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) रुग्णवाहिकांची थकित देयके दिनांक ११/०२/२०१६ रोजी अदा करण्यात आलेली आहेत.

---

## मुलुंड (मुंबई) येथील कामगार रुग्णालयाची झालेली दुरवस्था

**(१६) ३९४२५ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य कामगार रुग्णालय, मुलंड (मुंबई) येथे औषधांचा तुटवडा, मनुष्यबळीची कमतरता, आधुनिक यंत्रसामुग्रीचा अभाव इ.अनेक समस्या मुलुंडच्या कामगार रुग्णालयात असल्याने उपचाराविना गरीब रुग्णांचे हाल होत असून नाईलाजास्तव त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार घेण्याची पाळी आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी दिनांक २८ मे, २०१५ रोजी मा.आरोग्यमंत्र्यांना पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार रुग्णालयाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली अथवा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०७-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

अनुदाना अभावी औषधी पुरवठादारांची देयके मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहिली आहेत. त्यामुळे काही पुरवठादारांनी औषधांचा पुरवठा न केल्याने औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे. तथापि, इतर शासकीय रुग्णालयांकडून अथवा स्थानिक खरेदी करुन विमा रुग्णांना औषधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

रिक्त पदांमुळे रुग्णसेवेत अडथळा होऊ नये याकरिता राकावि माहमंडळामार्फत १ वर्षाच्या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपात अंशकालीन विशेषज्ञांची आणि शासनामार्फत बंधपत्रिक वैद्यकीय अधिकारी व परिचारिकांची नियुक्ती करण्यात येते. सद्य:स्थितीत सदर रुग्णालयात भिषक (उरो) अस्थिरोग तज्ञ, नाक कान घसा तज्ञ व प्रसुती व स्त्रीरोग तज्ञ ह्या ४ अंशकालीन विशेषज्ञांची तसेच ०९ बंधपत्रिक वैद्यकीय अधिकारी व १६ परिचारीकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर रुग्णालयात दैनंदिन व तातडीच्या उपचाराकरिता आवश्यक यंत्र सामुग्री उपलब्ध असून सदर रुग्णालयातील “रुग्णालय विकास समिती” मार्फत आवश्यक त्या ठिकाणी नवीन वैद्यकीय उपकरणे व यंत्र सामुग्री खरेदी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर रुग्णालयामार्फत सन २०१५-१६ मध्ये माहे डिसेंबर पर्यंत ३१,३२२ विमा रुग्णांना बाह्य रुग्ण उपचार देण्यात आले आहे. तसेच ६९४ लघू व २६१ मोठ्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून ४६९ प्रसुती करण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) राकवियो रुग्णालयात नविन यंत्रसामुग्री/उपकरणे खरेदी /दुरुस्ती व देखभाल नवीन पदे भरणे इ. कामे जलदगतीने करणे, निधी वेळेत खर्च करणे व सेवेचा दर्जा उंचावून विमारुग्णांना समाधानकारक सेवा पुरविणे, याकरिता महाराष्ट्र राज्यासाठी राज्यस्तरिय राज्य कामगार विमा योजना महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय राज्यमंत्री मंडळांने दि.३१.०५.२०१६ रोजी घेतला आहे.

---

## मौजे वडद आणि मौजे तळवली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील पाझर तलावांच्या दुरुस्तीबाबत

**(१७) ३९९१३ (२९-०४-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वडद आणि मौजे तळवली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील पाझर तलाव नादुरुस्त असल्यामुळे या गावांना उन्हाळ्याच्या दिवसात तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागते, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर दोन्ही गावातील पाझर तलावांच्या दुरुस्तीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मंत्री, ग्रामविकास व जलसंधारण यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय
(३) असल्यास, पाझर तलावांच्या दुरुस्ती करणेसाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१६) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) १) मौजे वडद येथील पाझर तलावाचे भरावातून मोठ्या प्रमाणात गळती असल्यामुळे दुरुस्ती ऐवजी नव्याने संपूर्ण बांधकाम करणे आवश्यक आहे. त्यासाठीचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही विभागीय स्तरावर प्रगतीत आहे.
२) मौजे तळवली येथील पाझर तलावाचे काम प्रगतीपथावर असून प्रकल्पावरील वाढीस खर्चासाठी सुधारीत प्रशासकिय देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मजरेवाडी (ता.उत्तर सोलापूर) हद्दीतील २२ सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जमिनी बाबत

**(१८) ४०४५० (०७-०५-२०१६). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मजरेवाडी (ता.उत्तर सोलापूर) हद्दीतील २२ सहकारी गृहनिर्माण संस्थांना मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या मार्फत सन १९७१ ला सर्वे नं ५७० ते ५९४ या वन विभागाच्या जमिनी मंजूर करण्यात आली असून या जमिनींचे निर्वनीकरण करण्यात आले नाही. असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) सदरील जमिनीचे खरेदी विक्री व्यवहारावर वन विभागाने आक्षेप घेतला आहे असेहि निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(३) असल्यास, सदर जमिनींचे निर्वनीकरण करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर जमिनीचा दर्जा राखीव वन असा आहे. सदर जमिनीचे खरेदी व्यवहारास वन विभागाने आक्षेप घेतले नाही. तथापि जमिनीचा दर्जा राखीव वन असल्याने त्याची खरेदी विक्री करता येत नाही.
(३) अद्याप कोणतीही कार्यवाही सुरु करण्यात आलेली नाही.
(४) सदर क्षेत्राचे शर्तभंग प्रकरणी चौकशीची कार्यवाही जिल्हाधिकारी सोलापूर यांचेमार्फत सुरु आहे.

---

## अमरावती जिल्यातील अनेक कोल्हापूरी बंधारे तसेच साठवण तलावाच्या फळया गायब झालेल्या असून पाणी अडवा पाणी जिरवा या योजना अयशस्वी झाल्याबाबत

**(१९) ४३००८ (२९-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्यातील अनेक कोल्हापूरी बंधारे तसेच साठवण तलावाच्या फळया गायब झालेल्या असून पाणी अडवा पाणी जिरवा या योजना अयशस्वी झाल्याचे माहे, डिसेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कोल्हापूरी बंधारे व साठवण तलावाच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१६-०७-२०१६) :**(१) नाही.

तथापि, सन २०१५-१६ या वर्षामध्ये लघु सिंचन जिल्हा परिषद विभाग, अमरावती या कार्यालयाअंतर्गत १०४ कोल्हापूरी पध्दत बंधारे व १९ साठवण बंधारे असे एकूण १२३ बंधाऱ्यांमध्ये फळया टाकून पाणी अडविण्यात आलेले आहे. तसेच लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, अमरावती यांचे कार्यालयांतर्गत सुध्दा २६ कोल्हापुरी पध्दत बंधाऱ्यांमध्ये फळया टाकून पाणी अडविण्यात आलेले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील मनमाड येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी आलेल्या महिलेची पैशासाठी अडवणूक केल्याबाबत**

**(२०) ४३२१२ (१०-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील मनमाड येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी आलेल्या येवला तालुक्यातील गोपाळवाडी येथील एक गरीब महिलेची डॉक्टरांनी पैशासाठी अडवणूक केल्याची बाब समोर आली असून या डॉक्टरांवर कारवाई करण्याची मागणी आरोग्य समितीचे सदस्य यांनी केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित डॉक्टरवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

तथापि, दै.सकाळ वृत्तपत्रात दि.२/०९/२०१५ रोजी तशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) सदर छापून आलेल्या बातमीच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करण्यात आली असून सदर चौकशीत महिलेची डॉक्टरांनी पैशासाठी अडवणूक केली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

---

**सातारा येथील ढेंबेवाडी-पाटण रस्त्याच्या ढेंबेवाडी हद्दीमधील काही मौल्यवान झाडांची बेसुमार वृक्षतोड**

**(२१) ४३४७५ (०७-०५-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथील ढेंबेवाडी-पाटण रस्त्यांच्या ढेबेवाडी हद्दीमधील साग, निलगिरी, लिंब, धावडा, ऐन, कोसंब, आंबा, फणस, जांभूळ, आकेशिया, चंदन, बेल इत्यादी काही झाडांची बेसुमार राजरोसपणे वृक्षतोड सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने वृक्षतोड थांबविण्यासाठी अनेक निर्बंध घातले असतानाही अवैधरित्या वृक्षातोडीबाबत सातारा वनविभागाचे अधिकारी कोणतीच कारवाई करीत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अश्या बेसुमार वृक्षतोडीमुळे भविष्यात निसर्गामध्ये तापमानवाढीसारख्या भयंकर संकटाला सामोरे जावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०७-२०१६) :**(१) सातारा येथील ढेबेवाडी पाटण रस्त्याच्या ढेबेवाडी हद्दीतील नियत क्षेत्रातील वनक्षेत्रातून जाणाऱ्या रस्त्याचे कडेने साग, धावडा, ऐन, फणस, जांभूळ, अकेशिया, चंदण बेल इत्यादी झाडांची वृक्षतोड झालेली नाही. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ढेबेवाडी-पाटण रस्त्याचे रुंदीकरण करणेचे काम चालू असताना सार्वजनिक बांधकाम खात्याचे मालकीचे क्षेत्रात ०/० ते ०/७०० मीटर अंतरात असलेल्या निलगीरी-५, वाळवा-२, सुबाभूळ-३, बाभूळ-२, लिंब-३, व करंज-८ अशी एकुण २३ झाडे रुंदीकरण करणेचे क्षेत्रात येत असलेने त्यांची तोड सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करणेत आली आहे.

(२) हे, खरे नाही.

अवैध वृक्षतोड हेऊ ने म्हणून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

१) जंगलात गस्त करण्यात येते.
२) बिट निरिक्षण करण्यात येते.
३) फिरते पथक कार्यरत आहे.
४) परिक्षेत्र स्तरावर संरक्षणासाठी वाहनपुरवठा करण्यात आला आहे.
५) पोलीस विभागाची मदत घेण्यात येते. शस्त्र पुरवठा करण्यात आला आहे.
६) वनगुन्हा घडल्यास तात्काळ कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सटाणा (जि.नाशिक) येथील वन परिमंडळ अधिकाऱ्यांने केलेला गैरव्यवहार

**(२२) ४३६९० (०७-०५-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सटाणा (जि.नाशिक) येथील वन परिमंडळ अधिकाऱ्यांनी ४० लाख ५० हजार रुपयांचा अपहार केल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गैरव्यवहार करणाऱ्या वन परिमंडळ अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०७-२०१६)** :(१) होय.
रुपये ४१,६०,६९५/- इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) होय.
(३) श्री.डी.के.नंदाळे, वनपाल सटाणा यांनी संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे सचिव म्हणून विकासात्मक कामांसाठी दिलेल्या निधीपैकी रुपये ४१,६०,६९५/- इतकी रक्कम परस्पर खात्यामधून काढून स्वत:च्या ताब्यात ठेवली हे स्पष्ट झाल्याचे त्यांना दि. ०८.०१.२०१६ रोजी निलंबित करण्यात आले असून विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच त्यांच्याविरुध्द दि. ०९.०३.२०१६ रोजी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देवगड (जि.सिंधुदुर्ग) येथील ग्रामीण रुग्णालयात कंबरदुखीवर उपचार करण्यासाठी दखल करण्यात आलेल्या रुग्णाला दिलेल्या इंजेक्शनमुळे झालेला मृत्यु

**(२३) ४४३७१ (१०-०५-२०१६). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) येथील ग्रामीण रुग्णालयात कंबरदुखीवर उपचार करण्यासाठी दखल करण्यात आलेल्या रुग्णाला दिलेल्या इंजेक्शनमुळे दिनांक २६ डिसेंबर, २०१५ रोजी त्याचा मृत्यु झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णाला डॉ.अम्रिश आगाशे यांनी परिचारीकेमार्फत दिलेल्या इंजेक्शनमुळे सदर रुग्णाचा मृत्यु झाल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार दोषी असलेल्यांविरुध्द आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०७-२०१६)** :(१) हे खरें आहे.
(२) सदर प्रकरणी दि.२५/१२/२०१५ रोजी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली चौकशी करण्यात आली.
(३) चौकशी अहवालाच्या अनुषंगाने दोषी असलेले संबंधित डॉ. अंबरिश आगाशे यांना शासन स्तरावरुन सेवेतून तात्काळ निलंबित केले असून संबंधीत अधिपरिचारीका श्रीम. राजेश्री राणे व श्रीम. निषा जाधव यांना उपसंचालक स्तरावरुन निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिंदखेडा (जि.धुळे) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदाबाबत

**(२४) ४५१२४ (११-०५-२०१६). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंदखेडा (जि.धुळे) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकिय अधिकारी वर्ग १ व वर्ग २ ची पुढे गेल्या अनेक महिन्यापासुन रिक्त असुन क्ष किरण तंत्रज्ञ देखील गेल्या १५ महिन्यापासुन उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच परीचारीका, कक्षसेवक अशी अनेक पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षकाचे पद सेवानिवृत्तीमुळे दि. ३१.१०.२०१३ पासून रिक्त आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ३ पदांपैकी २ पदे भरलेली आहेत व दंतशल्य चिकित्साक हे पद रिक्त आहे. मात्र क्ष-किरणतंत्रज्ञ हे पद दि. १७.०६.२०१५ पासून भरलेले आहे.

(२) अंशत: खरे आहे,

रुग्णालयात अधिपरिचारीकेचे १ पद दि. २२.०७.२०१५ पासून रिक्त आहेत. कक्षसेवकाची २ पदे दि. ३१.०५.२०१२ व ३१.०५.२०१४ पासून रिक्त आहेत.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. तसेच गट-क व गट-ड ची रिक्त पदे भरण्याबाबत जाहिरात देण्यात आलेली असून सदरहू रिक्त पदे भरण्याची कार्यवाही उपसंचालक नाशिक स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील लघुसिंचन प्रकल्प प्रशासकीय मंजूरी, निविदा प्रकियेमुळे तसेच निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(२५) ४५२८९ (२५-०४-२०१६). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील प्रशासकीय मंजूरी, निविदा प्रकियेमुळे तसेच निधीअभावी प्रलंबित असलेल्या लघुसिंचन प्रकल्पाच्या कामांना तात्काळ निधी उपलब्ध करून कामे तातडीने पुर्णत्वास नेण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ डिसेंबर, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री तसेच राज्यमंत्री, जलसंधारण यांच्याकडे पत्रव्यवहार करूनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजापूर व लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यातील जांभवली लघुसिंचन प्रकल्प, तुळसवडे लघुसिंचन असल्यास, कुडेवाडी, शिरवली, विवळी, लघुसिंचन प्रकल्प, चोरवणे,

वांझोळे, लघुसिंचन प्रकल्प, भोवडे (तिथवळी) लघुसिंचन प्रशासकीय मंजुरी रद्द केल्यामुळे प्रलंबित आहेत तर कोलेवाडी, कांचरी, लघुसिंचन प्रकल्प, निविदा प्रक्रिया रद्द केल्यामुळे प्रलंबित त्याचप्रमाणे शिवणे, कोंडवाडी, लघुसिंचन प्रकल्प, कुरूंग, कोडगे, आरगाव, लघुसिंचन प्रकल्प, खाणु लघुसिंचन प्रकल्प निधीअभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त लघुसिंचन प्रकल्पांना तात्काळ मंजूरी देऊन निधी उपलब्ध करून प्रकल्प पूर्णत्वास नेण्याबाबत दिनांक १७ जानेवारी, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री रत्नागिरी जिल्हयाच्या दौऱ्यावर असताना त्यांनी आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.

लोकप्रतिनिधींनी सादर केलेले दिनांक १८/११/२०१५ रोजीच्या निवेदनावर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचेकडून अहवाल मागविण्यात आलाआहे.

(२) रत्नागिरी जिल्हयातील जांभवली ता.राजापूर तुळसवेडा ता.राजापूर,, कुडेवाडी, ता.लांजा, शिरवली, ता.लांजा, विवळी ता.लांजा, चोरवणे व वांझोळे ता.संगमेश्वर या लघु सिंचन योजनांची प्रशासकीय मान्यता महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे दिनांक १४/१०/२०१४ चे पत्रान्वये रद्द करण्यात आल्या.

महामंडळाच्या संचालक मंडळाची ४९ वी बैठक दिनांक २४/९/२०१५ रोजी मा.अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. या बैठकीमध्ये २९ योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आली या २९ योजनामध्ये भोवडे (तिथवळी) ता.संगमेश्वर, कोलेवाडी व कोचरी ता.लांजा या लघु सिंचन योजनांचा समावेश आहे. शिवणे ता.राजापूर, कुरुंग, कोडगे व आरगाव ता.लांजा व खाणु साठवण तलाव ता.रत्नागिरी या योजनांची कामे प्रगतीपथावर असून या योजनांची देयके अधीक्षक अभियंता , लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, ठाणे यांच्याकडून महामंडळास सादर करण्यात आलेली आहेत. कोंडवाडी लघु पाटबंधारे योजना ता.राजापूर ग्रामस्थांनी कामास विरोध केला असून पुनर्वसनाच्या विशेष बाबीचा प्रस्ताव उपायुक्त पुनर्वसन नवी मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

(३) आश्वासनाबाबतची माहिती अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, ठाणे यांचे कार्यालयात आढळून येत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खोपडी ते मिरगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) वळण योजनांच्या**
**निविदा प्रक्रियेवरील स्थगिती रद्द करण्याबाबत**

**(२६) ४५४६५ (२१-०४-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर विधानसभा मतदार संघातील खोपडी ते मिरगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) वळण योजनांच्या निविदा प्रक्रियेवरील बंदी उठविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.ग्रामविकास व जलसंधारण मंत्री यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन मंजूरी मिळून देखील जलसंधारण मंडळाने योजनेच्या निविदा प्रक्रियेस दिलेल्या तात्पुरत्या स्थगिती उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१६) :**(१) होय.

(२) शासन निर्णय क्र. मजम-२०१५/प्र.क्र.६६/जल-३, दिनांक ८/५/२०१५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीच्या अहवालावर दिनांक २४/९/२०१५ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या ४९ व्या बैठकीत महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत दिनांक १/०४/२०१४ नंतर प्रशासकीय मान्यता दिलेल्या (१२०० योजना) तसेच दिनांक १/४/२०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता दिलेल्या (११३० योजना) परंतु क्षेत्रिय कामे सुरु झाली नाहीत अशा एकूण २३३० स्थगिती दिलेल्या योजनांपैकी जलयुक्त शिवार अंतर्गत येणाऱ्या १०१ योजनांची (किंमत रुपये ५९.०० कोटी) कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आणि उर्वरित स्थगिती दिलेल्या योजनांच्या प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचा ठराव संचालक मंडळाने पारित केला आहे. पारित ठरावास अनुसरुन, जलयुक्त शिवार अंतर्गत येणाऱ्या १०१ योजनांमध्ये खोपडी ते मिरगाव वळण योजनेचा समावेश असून पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### निजामपूर (ता.साक्री, जि.धुळे) येथील नकटया बंधाऱ्याची उंची वाढविण्याबाबत

**(२७) ४५५१६ (२९-०४-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री तालुक्यातील निजामपूर येथील नकट्या बंधा-यावरुन पाणीपुरवठा केला जातो अपुऱ्या पावसामुळे सदर पाणीपुरवठा कमी पडतो बंधा-याची उंची वाढविल्यास बराच पाण्याचा साठा वाढू शकतो व निजामपूर गावाचा पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर होऊ शकते अशी गावकऱ्यांची मागणी आहे याबाबतीत संबंधित लोकप्रतिनिधीनी शासनाकडे वेळोवेळी मागणी करुनही शासन याकामाकडे दुर्लक्ष करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१६-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) सदर बंधाऱ्याची उंची वाढविल्यास संकल्पनेत बदल होईल. तसेच पाझर तलाव काठावरील जमीन पातळी व धरणाच्या माथ्याची पातळी ही सारखी असल्याने, तांत्रिकदृष्ट्या उंची वाढविणे योग्य नाही. पाझर तलावाच्या वरच्या बाजुस मधल्या काळात जलसंधारणाची कामे झाली आहेत. पाझर तलावाच्या जागेनुसार तांत्रिकदृष्ट्या उंची वाढविण्यास वाव नाही. सद्यस्थितीत बंधाऱ्यातील उपलब्ध पाणीसाठ्यावरुन निजामपूर गावास पाणी पुरवठा होत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील ९ जिल्हा परिषदांच्या ४४९ लघुसिंचनांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२८) ४६०६२ (३०-०४-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ९ जिल्हा परिषदांच्या ४४९ लघुसिंचनांच्या कामांच्या वेळेत व किंमतीत वाढ झाल्याचे ताशेरे कॅगच्या अहवालात ओढण्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लघुसिंचनांची कामे पुर्णत्वास नेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१६) :**(१) होय.
(२) जिल्हा वार्षिक योजनेतून निधी उपलब्धतेनुसार कामांचे नियोजन करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे जिल्ह्यातील प्रादेशिक मनोरुग्णालयामध्ये सुपर स्पेशलिटी रुग्णालय उभारण्यासंदर्भात

**(२९) ४६१६० (११-०५-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील प्रादेशिक मनोरुग्णालयामध्ये सुपर स्पेशलिटी रुग्णालय उभारण्यासंदर्भात शासनाच्या विचारधीन असलेल्या प्रस्तावावर निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, तसेच परिसरातील वाढती लोकसंख्या व आरोग्याच्या सुविधा अपुऱ्या पडत असल्याने गोरगरीबांना उच्च दर्जाच्या आरोग्य

सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सदरहू निर्णयाची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०७-२०१६) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. यासंबंधी अधिकची माहिती क्षेत्रीय स्तरावर प्रलंबित आहे.

---

## ठाणे जिल्ह्यातील पारसिकच्या डोंगरावरील वन खात्याच्या जमिनीवरील अतिक्रमणे काढून टाकण्याबाबत

**(३०) ४६१६१ (०७-०५-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील पारसिकच्या डोंगरावरील वन खात्याच्या जमिनीवरील १६,३७८ अतिक्रमणापैकी किती अतिक्रमणे माहे डिसेंबर, २०१५ अखरे काढून टाकण्यात आली, हे खरे आहे काय
(२) असल्यास, उर्वरित अतिक्रमणे केव्हापर्यंत काढण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी अतिक्रमणे पुन्हा होऊ नयेत याकरिता कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, याबाबत होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०७-२०१६) :**(१) ठाणे वनपरिक्षेत्रातील १६१९० अतिक्रमणांपैकी पारसिक डोंगरावरील मौजे पारसिक, सर्वे क्र.९७/अ, ब आणि मुंब्रा, सर्वे क्र.१२७/अ मधील वन जमिनीवर ३७५९ अतिक्रमण आहेत. पारसिक डोंगरावरील जुनी अतिक्रमणे हटथ्वण्यात आलेली नाहीत.

तथापि, सन २०१२-१३ ते २०१५-१६ या ४ वर्षात पारसिक डोंगरावरील २४७६० चौ.मीटर क्षेत्रावरील ३६१ नवीन अतिक्रमण निष्कासीत करण्यात आले आहे.
(२) जनहित याचिका क्र.१,३५,३६/२००७ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २५.१०.२०१३ रोजी अंतिम निर्णय दिलेला असून, सदर निर्णयातील परिच्छेद क्रमांक २१ (E) (i) (ii) नूसार वनक्षेत्रावरील अतिक्रमणे निष्कसनाकरिता जिल्हाधिकारी, ठाणे यांनी निधी उपलब्ध करुन द्यावा व जिल्हाधिकारी, ठाणे यांनी निधी प्राप्त होताच वन विभागाने वनक्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही करावी, अस निर्देश दिले आहेत.

(३) एकदा निष्कासीत करण्यात आलेली अतिक्रमणे होणाऱ्या भागात नियमित हद्दीचे सिमांकन तपासणे व दुरुस्ती करणे या उपाययोजना करण्यात येत आहे. तसेच गरजप्रमाणे संरक्षक भिंत उभारणेचे नियोजन केले जात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंदाणे (ता.शहादा, जि.नंदुरबार) येथील रहाटयावड धरणाची नवीन सुप्रमा मंजुर करण्याबाबत**

**(३१) ४६७१५ (०५-०५-२०१६). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंदाणे (ता.शहादा, जि.नंदुरबार) येथील रहाटयावड धरणाची सद्यःस्थिती काय आहे,
(२) असल्यास, धरणाची नवीन सुप्रमा मंजुरीची फाईल मागील दोन वर्षापासून संबंधित विभागाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१६-०७-२०१६) :**(१) सद्य:स्थितीत सदर धरणाचे काम बंद आहे.
(२) व (३) सदर प्रस्तावास नियोजन विभागाची सहमती प्राप्त झालेली असून प्रस्ताव सद्य:स्थितीत वित्त विभागाच्या सहमती करीता सादर आहे. सदर प्रस्तावास व्यय अग्रक्रम समतीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे करंजविहीरे (ता.खेड, जि.पुणे) येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात सुविधांचा अभाव आणि नादुरुस्त इमारतीमुळे रुग्णांना उपचाराकरिता अडचणी येत असल्याबाबत**

**(३२) ४७३८४ (११-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे करंजविहीरे (ता.खेड, जि.पुणे) येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात सुविधांचा अभाव आणि नादुरुस्त इमारतीमुळे रुग्णांना उपचाराकरिता अडचणी येत असल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपचाराकरिता अडचणी येत असल्याने सुविधा उपलब्ध करणेबाबत वैद्यकीय अधिकारी, करंजविहीरे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांस दिनांक १७ नोव्हेंबर २०१५ रोजी निवेदन द्वारे मागणी केली आहे, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने प्राथमिक आरोग्य रुग्णालयात सुविधा उपलब्ध करून देणेबाबत काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०७-२०१६) :**(१) अशत: खरे आहे. तथापि प्राथमिक आरोग्य केंद्रातील मोकळ्या जागेतील चबुत-याचे पत्रे तुटले होते, त्यामुळे रुग्णसेवेत बाधा निर्माण झाली नाही.
(२) होय.
(३) आवश्यक ती दुरुसती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आदिवासी शेतकऱ्यांना शेतातील झाडे तोडून खुल्या बाजारात विक्रीसाठी वनविभागाची परवानगी देण्याबाबत**

**(३३) ४८०९९ (०७-०५-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकऱ्यांना किंवा जमीन मालकांना जमिनीतील झाडे तोडून विक्रीसाठी खुल्या बाजारात विक्री करण्याची परवानगी असते, परंतु आदिवासी लोकांना त्यांच्या शेतातील किंवा जमिनीतील झाडे विक्री करण्याची परवानगी नसते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी शेतकरी यांच्या शेतातील झाडे तोडून वनविभागाच्या डेपोमध्ये जमा करावे लागतात व लिलावानंतर सदर आदिवासी शेतकऱ्यांना त्याचे पैसे मिळतात, या प्रक्रियेला १ ते २ वर्षाचा कालावधी लागतो व त्यात झाडाचा वजन घटतो, कमी घनमीटर माल (झाडाचा) होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,
(३) आदिवासी शेतकरी यांच्या शेतातील झाडे (वृक्ष) (Non shedule tree) आडजात, बाबूळ खुल्या बाजारात विक्रीसाठी परवानगी देण्याबाबत मा.वन मंत्र्यांना दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार आदिवासी शेतक-यांना शेतातील झाडे खुल्याबाजारात विक्रीसाठी परवानगी देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(५) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.
महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवटदाराच्या झाडाची विक्री (नियमन) अधिनियम, १९६९ या कायद्याचे तरतुदीनुसार आदिवासी शेतकऱ्यांच्या झाडाची विक्री अर्ज प्राप्त झाल्यानंतर वनविभागामार्फत तोड करुन वनविभागाचे आगारातून आदिवासी मालाची विक्री ही खुल्या जाहीर लिलावात होऊन त्याबाबतचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना मिळावा व त्याचे हित जोपासले जावे ही लक्षात घेऊन कार्यवाही केली जाते.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) शासन स्तरावर विचाराधीन आहे.
(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## वसई येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाची क्षमता ३०० खाटांपर्यंत वाढवून देण्याबाबतची मागणी

**(३४) ४९४२० (११-०५-२०१६). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने २००१ च्या लोकसंख्येवर आधारित राज्यात आरोग्य संस्था स्थापनेचा बृहत आराखडा ९ जुन, २०१४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मंजूर करुन त्यानुसार शासनाने वसई येथे नवीन १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रुग्णालय २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत असून मात्र २०११ च्या जनगणनेनुसार १२.११ लाख व त्यानंतर सध्याची वाढीव लोकसंख्या २० लाखांच्या आसपास पोहचली असून या वाढत्या लोकसंख्येस १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय अपुरे पडणार असल्याचे सदरहू रुग्णालयाची क्षमता ३०० खाटांपर्यंत वाढवून देण्यात यावी यासंबधी सातत्याने स्थानिक लोकप्रतिनिधी व वसई-विरार शहराचे मा.महापौर यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे पुन्हा माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा अद्यापी निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०४-२०१६) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर बाबीसंबंधी प्रस्ताव क्षेत्रीय स्तरावरुन मागविण्यात आला असून तो प्राप्त झाल्यानुतर त्याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही करण्यात येईल.

---

## भंडारा जिल्ह्यातील माजी मालगुजारी (मामा) तलावांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३५) ४९४३४ (२९-०४-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील माजी मालगुजारी (मामा) तलावांच्या देखभाल व दुरुस्तीकडे प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत आहे, या तलावाची पाणी साठविण्याची क्षमता कमी होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जि.प. कडे देखभालीसाठी पुरेसा निधी नसल्याने तलावांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याचेही आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावाच्या दुरुस्तीच्या कामासाठी अद्यापपर्यंत निधी उपलब्ध का करुन देण्यात आला नाही,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१६) :**(१) व (२) होय, हे  अंशत: खरे आहे.

(३) विविध योजनांच्या अंतर्गत मा.मा.तलावांच्या दुरुस्तीसाठी प्राप्त होणाऱ्या निधीमधुन तातडीने आवश्यक त्या तलावांची दुरुस्ती करण्यात आलेली आहेत. परंतु उपलब्ध निधी सर्व मा.मा.तलावांच्या दुरुस्तीसाठी पुरेसा ठरत नाही.

(४) राष्ट्रिय कृषी विकास योजना, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम व जलयुक्त शिवार अभियानांतर्गत २६५ मा.मा.तलावांची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. तसेच जलयुक्त शिवार अभियानांतर्गत ३१ दुरुस्तीची कामे चालू आहेत. "मा.मा.तलावांचे पुनरुज्जीवन अभियानांतर्गत" सन २०१६-१७ ते २०१८-१९ या तीन वर्षात ८८७ मा.मा.तलावांची दुरुस्ती नियोजित आहे. त्यापैकी २२२ मा.मा.तलावांच्या सर्वेक्षणाची कार्यवाही सुरु आहे. सदर तलावांचे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करुन सन २०१६-१७ मध्ये प्रत्यक्षात कामे सुरु करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पश्चिम घाटातील २२ तालुके इको सेन्सिटीव्ह झोन म्हणून जाहिर केल्याबाबत

**(३६) ४९८८७ (०७-०५-२०१६).   श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम घाटाच्या पर्वतरांगांमधील जैववैविध्य जपले जावे, यासाठी शासनाने जेष्ठ पर्यावरण तज्ञ श्री.माधव गाडगीळ यांच्या अहवालानुसार पश्चिम घाटातील महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, तामिळनाडू या राज्यातील पर्यावरण संवेदनशील क्षेत्र म्हणजे इको सेन्सिटिव्ह झोन जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेड तालुक्यातील २२ तसेच आंबेगाव तालुक्यातील ३७ गावांतील लोकांनी अतिसंवेदनशील क्षेत्र लागू करण्यात येवू नये असे ग्रामसभांचे ठराव केंद्रीय पर्यावरण व वनखात्यांच्या सचिवांकडे पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, उक्त गावातील ग्रामस्थांनी विरोध करण्याचे कारण काय याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास त्यात काय आढळून आले आहे,

(५) अद्याप चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०६-२०१६) :**(१), (२), (३) व (४) पश्चिम घाटातील पर्यावरणाचे सरंक्षण व संवर्धन करण्याचे दृष्टीने केंद्र शासनाकडून सन २०१० मध्ये डॉ. माधव गाडगीळ यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने २०१२ मध्ये केंद्र शासनाला अहवाल सादर केला आहे. या अहवालातील त्रुटी तसेच आक्षेपाचा अभ्यास करण्याकरिता केंद्र शासनाने  डॉ.कस्तुरीरंगन यांचे अध्यक्षतेखाली २०१२ मध्ये High Level

Working Group (HLWG) गठीत करण्यात आला. सदर कार्यगटाला पश्चिम घाट परि-संवेदनशील क्षेत्र घोषीत करण्यासाठी अहवाल तयार करणेस सूचित करण्यात आले. डॉ. के कस्तुरीरंगन समितीने २०१३ मध्ये अहवाल तयार करुन केंद्र शासनाला सादर केला आहे. केंद्र शासनाने दिनांक १६.११.२०१३ चे ज्ञापनाद्वारे डॉ. के. कस्तुरीरंगन समितीचे अहवालाला तत्वत: मान्ता दिली. तथापि, डॉ.के. कस्तुरीरंगन समितीचे अहवालातील प्रस्तावित परि-संवेदनशील क्षेत्राची राज्य शासनाद्वारे प्रत्यक्ष क्षेत्र व सीमा पाडताळणी करण्यासाठी केंद्र शासनाने राज्य शासनाला निर्देशीत केले त्यानुसार राज्य शासनाने डॉ. के.कस्तुरीरंगन अहवालातील पश्चिम घाट परि-संवेदनशील क्षेत्राची सीमा व क्षेत्र पडताळणीचे काम ग्रामस्तरीय समिती व तालुका स्तरीय समितीमार्फत करण्यात आली असून खेड तालुक्यातील २२ तसेच आंबेगाव तालुक्यातील ३७ गाव जिल्हास्तरीय समितीने परिसंवेदनशील क्षेत्रातील समाविष्ट करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार राज्य शासनाने केंद्र शासनास अहवाल पाठवला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाझरे (ता.सांगोले, जि.सोलापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील निवासी वैद्यकिय अधिकऱ्यांसाठी निवासी इमारत बांधण्याबाबत**

**(३७) ५२०५३ (११-०५-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नाझरे (ता.सांगोले, जि.सोलापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील १) वैधकिय अधिकारी २) औषध निर्माण अधिकारी ३) परिचारिका ४) आरोग्य सहाय्यक यांची निवासस्थाने धोकादायक झाल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सोलापूर यांच्या दिनांक १५ मे, २०१५ च्या आदेशाप्रमाणे निवासस्थानाच्या इमारती पाडून टाकण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, त्या ठिकाणी नवीन इमारती बांधण्याचा प्रस्ताव सोलापूर जिल्हा परिषदेने मंजूर करून त्याचे अंदाजपत्रक तयार केले आहे काय,

(३) असल्यास त्याची अंदाजे रक्कम किती आहे व त्या इमारती केव्हा बांधण्यात येणार आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०७-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,०४,७५,३२३/- असून सदर इमारती माहे मार्च २०१७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**भरडवाड (ता.खटाव, जि.सातारा) येथे येरळा नदीवर स्थानिकस्तर विभागाकडून बांधलेला बंधाऱ्याला गळती लागली असून या बंधाऱ्यांची ऊंची कागदोपत्री दाखविण्यात आल्याबाबत**

**(३८) ५२१०१ (२९-०४-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खटाव तालुक्यातील (जि.सातारा) भरडवाड येथे येरळा नदीवर स्थानिकस्तर विभागाकडून बांधलेला बंधाऱ्याला गळती झाली असून या बंधाऱ्यांची ऊंची कागदोपत्री दाखविण्यात आली आहे, याची सखोल चौकशी करण्याची लेखी मागणी सरपंचासह ग्रामस्थांनी एका लेखी निवेदनाद्वारे मा.ग्रामविकास व जलसंधारण मंत्री यांच्याकडे केली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने सदर निवेदनानुसार चौकशी करुन सदर निकृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१६)** :(१) होय. अशी बातमी दिनांक २६/११/२०१५ रोजीच्या दैनिक पुढारी या वृतपत्रात आली होती. सदर कामाची पहाणी केल्यानंतर सदरचे काम गुणवत्तेनुसार झाले असून आवश्यक गुणवत्ता चाचण्या घेण्यात आल्या आहेत. बंधाऱ्यातून कोणत्याही प्रकारची गळती नाही याची खातरजमा कार्यकारी अभियंता, उपविभागीय अधिकारीव शाखा अभियंता, यांनी केली आहे. बंधाऱ्याची उंची नदीतळापासून १.५० मी. असून बंधारो आजही सुस्थितीत आहे. सन २०१४ व २०१५ सालात बंधारे पूर्ण क्षमतेने भरलेला होता. दिनांक २१/५/२०१४ पासून दिनांक ११/७/२०१४ पर्यंत काम सुरु असताना ग्रामस्थांनी स्थळ भेट दिलेली होती. त्यावेळी ग्रामस्थांना कामाबाबत माहिती देण्यात आलेली होती. त्यावेळी कामाच्या दर्जाबाबत कोणतीही तक्रार केली नव्हती त्यानी कामाबाबत समाधान व्यक्त केले होते.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्ह्यातील गिरणा धरणाच्या डाव्या व उजव्या ६९ जलसेतुची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३९) ५२५०९ (२८-०४-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील गिरणा धरणाच्या डाव्या व उजव्या ६९ जलसेतुची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याबाबत पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, त्यानुसार सदर जलसेतूची दुरुस्ती करुन पूर्ण क्षमतेने क्षेत्र ओळीच्या खाली आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.
(२) सिंचन प्रकल्पाच्या जलसेतूच्या बांधकामाची क्षेत्रीय अधिकाऱ्याकडून पाहणी केली आहे. त्यानुसार जामदा डाव्या व उजव्या कालव्यावर २ नविन जलसेतूंची कामे प्रगतीपथावर आहेत. ९ जलसेतू सुस्थितीत असून ७० जलसेतू दुरूस्तीची आवश्यकता आहे. दुरूस्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ) निम्न गिरणा कालव्यावरील ३ सेतूना गनायटींग करणे आवश्यक ब) पाझर डावा कालव्यावरील १४ जलसेतू-प्लॅस्टर व जॅकेटींगद्वारे दुरूस्ती आवश्यक व क) इतर ५३ जलसेतूच्या नाला रिग्रेडींग, बाजूच्या भिंतीची तसेच अस्तरीकरण दुरूस्ती, भिंतीवरील कोपिंग, फुटलेले पाईप बदलणे आवश्यक आहे.

(३) देखभाल दुरूस्तीसाठी उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार देखभाल व दुरुस्ती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यातील कोल्हापूर बंधाऱ्याची सद्य:स्थितीबाबत**

**(४०) ५२५५५ (२९-०४-२०१६). श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यात मार्च २०१६ पर्यंत कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे किती बांधले गेले आहेत व त्याला एकूण त्या वेळेस किती खर्च आला होता,

(२) असल्यास, या कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यापैकी किती बंधाऱ्यात प्रत्यक्ष पाणी साठा आज उपलब्ध आहे,

(३) असल्यास, उक्त बंधाऱ्यांची सिंचन क्षमता किती होती व या कोल्हापूरी टाईप बंधाऱ्यातील पाण्यावर आजामितीस किती क्षेत्र सिंचनाखाली आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१६) :**(१) लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, नाशिक अंतर्गत १० कोल्हापूरी बंधारे बांधण्यात आले असून त्यासाठी रुपये ११४.६४ लक्ष इतका खर्च झालेला आहे. तसेच जिल्हा परिषद विभाग, नाशिक यांनी ५२ कोल्हापूरी बंधारे बांधले असून त्यासाठी एकूण ३१८.६९ लक्ष इतका खर्च झालेला आहे. सदर बंधाऱ्यांची कामे दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत पूर्ण झालेली असून ६२ कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या बांधकामासाठी एकूण रुपये ४३३.३३ लक्ष निधी खर्च झालेला आहे.

(२) आजमितीस एकाही बंधाऱ्यात प्रत्यक्ष पाणीसाठा उपलब्ध नाही.

(३) ६२ बंधाऱ्यांची एकूण प्रकल्पीय सिंचन क्षमता १०२२.२१ हेक्टर आहे व प्रकल्पीय पाणीसाठा ४२५७.०० स.घ.मी. आहे.

(४) सद्य:स्थितीत बंधाऱ्यावरील लोखंडी बर्गे गहाळ झालेले आहेत. दरवाजांचे (Openings) सिल बिम्स व चॅनल्स खराब झालेले आहेत व बऱ्याच ठिकाणी अस्तित्वात नाहीत. बंधाऱ्याचे दगडी बांधकामाचे सुध्दा मोठ्या प्रमाणात तुटफुट व नुकसान झालेले आहे. या सर्व कारणांमुळे यापैकी कुठल्याही बंधाऱ्यात यापैकी कुठल्याही बंधाऱ्यात आज पाणीसाठा उपलब्ध नाही. त्यामुळे आजमितीस या कोल्हापूरी टाईप बंधाऱ्यातील पाण्यावर सिंचनाखाली असलेले क्षेत्र निरंक आहे.

---

**नद्याजोड प्रकल्प अंतर्गत जळगाव, धुळे व नंदुरबार या जिल्ह्यांना पाणी देण्याच्या धोरणांबाबत**

**(४१) ५२५५९ (२५-०४-२०१६). श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नद्या जोड प्रकल्प अंतर्गत सुरगाणा व पेठ तालुक्यातून पश्चिमेकडे वाहणाऱ्या नार-पार व त्यांच्या उपनद्यांचे पाणी गुजरात राज्याला देऊन त्याच्या बदल्यात उकई किंवा सरदार सरोवर या धरणांतून महाराष्ट्रातील जळगाव, धुळे नंदुरबार या खानदेशातील जिल्ह्याला पाणी देण्याचे धोरण शासनाने निश्चित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे धोरण शासनाने केव्हा निश्चित केले आणि त्याचे निकष काय आहेत व त्याची अंमलबजावणी शासन केव्हा पासून अंमलात आणणार आहे,
(३) असल्यास, वरील उकई किंवा सरदार सरोवर या धरणांतून महाराष्ट्राला पाणी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
उकई धरणाच्या जलाशयातुन ५ अघफू पाणी महाराष्ट्रातील तापी खोऱ्यात उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने गुजरात व महाराष्ट्र राज्यांदरम्यान सामंजस्य करार करण्यात आला आहे.
(२) व (३) नर्मदा पाणी तंटा लवादानुसार नर्मदा खोऱ्यातील १०.८९ अघफू पाणी महाराष्ट्राचे वाट्यास आले आहे. सदर पाण्याचे परिमाण नर्मदा खोऱ्यातुन महाराष्ट्रात आणणे आर्थिक दृष्ट्या खर्चिक व योजना कार्यान्वित होण्यासाठी मोठ्या कालावधीची आवश्यकता असल्याने या परिमाणापैकी ५ अघफू पाणी गुजरात राज्यास देऊन त्या बदल्यात गुजरात राज्यातील तापी नदीवरील उकई जलाशयातुन ५ अघफू पाणी महाराष्ट्रातील सरदार सरोवर प्रकल्प बाधितांना सिंचन सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र व गुजरात राज्यांत दिनांक ०७ जानेवारी, २०१५ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. सदर करारामुळे महाराष्ट्राच्या वाट्यास तापी खोऱ्याचे अतिरीक्त ५ अघफू पाण्याचे परिमाण उपलब्ध झाले आहे. सदर पाणी उकई जलाशयातुन छोट्या उपसा योजनांद्वारे सिंचनासाठी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे. सदर नियोजनानुसार नंदूरबार जिल्ह्यातील एकुण ४९ उपसा सिंचन योजनांद्वारे ३१०००० हे.सिंचन क्षमता निर्माण करण्याचे नियोजन आहे. सदर योजनेच्या पुर्व संभाव्यता अहवालाची (PFR) तांत्रिक छाननी सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलसंपदा विभागाच्या कनिष्ठ अभियंता गट ब या पदांच्या भरती प्रक्रियेबाबत**

**(४२) ५२६२८ (२५-०४-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाने नुकतीच १२५६ कनिष्ठ अभियंता गट ब या पदांची भरती प्रक्रिया सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पद भरतीसाठी पदविकास अनिवार्य केली आणि पदवीधारकांना अपात्र ठरविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पंतप्रधान यांनी जुने विकासास मारक कायदे बदलण्याबाबत सांगितले असतांनाही कनिष्ठ अभियंता गट ब भरती प्रक्रियेमध्ये सन १९९८ च्या नियमांनुसारच निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात लाखो पदवीधर अभियंते बेरोजगार आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या पदवीधर अभियंताना न्याय देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग व पाटबंधारे विभाग (जलसंपदा विभाग) अंतर्गत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर सरळसेवेने नियुक्ती करण्याबाबत सेवाप्रवेश नियम सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन अधिसुचना, दिनांक ०१.०१.१९९८ अन्वये विहित करण्यात आले आहेत. सदर सेवाप्रवेश नियम शासनास संविधानाच्या कलम ३०९ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तयार करण्यात आले आहेत त्यानुसार सदर भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.
(४) व (५) प्रचलित नियमानुसार कनिष्ठ अभियंता पदासाठी पदवीधारक व पदविका धारक या दोन्ही उमेदवारांसाठी वेगवेगळे कोटे राखीव ठेवलेले आहेत. सध्याची भरती ही पदवीका धारकांच्या कोट्यातील असल्याने त्यासाठी पदवीधारक पात्र नाहीत. पदवीधारक व पदविकाधारकांचे सेवाप्रवेश नियम वेगवेगळे आहेत. तसेच स्थापत्य अभियांत्रिकी पदविकाधारक राज्य लोकसेवा आयोगाच्या/केंद्रिय आयोगाच्या परिक्षेसाठी पात्र आहेत. त्यांना सेवेच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पोहनेर (ता.परळी) येथील तारगव्हान बंधारा निधी अभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४३) ५२८०९ (२८-०४-२०१६). श्री.आर. टी. देशमुख (माजलगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोहनेर (ता.परळी) येथील तारगव्हान बंधारा (गोदावरी नदिवरील) निधी अभावी २००६ पासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदरील बंधारा पुर्ण करण्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व सदर कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०६-२०१६) :**(१) नाही.
(२) तारगव्हाण बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यासाठी रु. ८१.६३ कोटींची आवश्यकता आहे. अर्थोपायाची स्थिती व सिंचन प्रकल्पावरील गुंतवणूकीचा अग्रक्रम विचारात घेऊन प्रकल्पास निधी उपलब्ध करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भ व मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पाची कामे असणाऱ्या सिंचन विकास महामंडळांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत**

**(४४) ५२९०१ (२९-०४-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.राज्यपालांच्या दिनांक १० मार्च, २०१५ रोजी च्या निदेशानुसार विदर्भ व मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पाची कामे असणाऱ्या सिंचन विकास महामंडळांना सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अधिकार शासनाने दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबतची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी विहित केलेल्या कार्यवाहीसाठी कालमर्यादा निश्चित करण्यात यावी, तसेच प्रकल्पांचा प्राधान्यक्रम ठरवून कार्यवाही करावी असे सुध्दा निर्देश आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, विदर्भ प्रदेशातील खारपाण पट्टयात मोडत असलेल्या अकोला जिल्हयातील एकूण ७ सिंचन प्रकल्पांचे काम सुधारित मान्यते अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त सिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) नाही. प्रकल्पांना अर्थसंकल्पीय तरतुदीच्या मर्यादेत मंजूर प्रशासकीय मान्यता/सुधारीत प्रशासकीय मान्यता पेक्षा अधिक खर्च करण्याकरीता वेळोवेळी सक्षम स्तरावर मंजुरी देण्यात आल्यामुळे प्रकल्पांची कामे सुधारीत प्रशासकीय मान्यता अभावी रखडलेली नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रात राहणाऱ्या शेतकरी व शेतमजुरांना रोजगार हमी योजनेअंतर्गत जॉब कार्ड देण्याबाबत**

**(४५) ५३००३ (२८-०४-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रात राहणाऱ्या शेतकरी व शेतमजुरांना रोजगार हमी योजना अंतर्गत जॉब कार्ड देण्यात येते परंतु मनरेगा अंतर्गत या शेतकऱ्यांना व शेतमजुरांना जॉब कार्ड देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनरेगा अंतर्गत जॉब कार्ड न दिल्यामुळे या शेतकरी शेतमजुरांना कामापासून वंचित रहावे लागू नये यासाठी या क्षेत्रातील शेतकरी व शेतमजुरांना मनरेगा अंतर्गत जॉब कार्ड देण्यात यावे अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री, ग्रामविकास व रोजगार हमी योजना यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०६-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) केंद्रीय कायद्यानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना “क” वर्ग नगर परिषदेला लागू नाही. यास्तव महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये “क” वर्ग नगर परिषदेचा समावेश करण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला असता, केंद्र शासनाने अनुक्रमे दि. १३/८/२०१५ व दि.४/९/२०१५ च्या पत्रान्वये “क” वर्ग नगर परिषद/ नगर पंचायत क्षेत्रात तसेच 'ब' वर्ग नगर परिषद हद्दीमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करणे शक्य नसल्याचे कळविले आहे.

तथापि, सद्या ज्या काही ग्रामपंचायतींचे क्षेत्र नगर परिषद/नगर पंचायत क्षेत्रात रुपांतरित झाले आहे. अशा रुपांतरित नगर परिषद/नगर पंचायत क्षेत्रात पूर्वीचीच म्हणजेच मनरेगाची जॉब कार्ड वापरण्याबाबत तसेच जी कामे महात्मा गांधी राग्रारोहयो अंतर्गत सुरु आहेत ती कामे राज्य रोहयोमध्ये वर्ग करुन सुरु ठेवण्याबाबतच्या दि.२१ मे, २०१५ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**अमरावती डीस्ट्रीक्ट बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना निधीबाबत**

**(४६) ५३१३९ (१४-०३-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती बार असोसिएशन यांना लायब्ररीकरीता ५०,००० हजाराचा निधी आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१४-१५ अंतर्गत शासनाकडून मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती डीस्ट्रीक्ट बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना सदरहू निधीबाबत जिल्हा नियोजन अधिकारी, अमरावती यांच्याकडे विचारणा केली असता जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी त्यांच्याशी असभ्य व उध्दटपणे वार्तलाप करुन त्यांचा अपमान केल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार मंजूर निधी बार असोसिएशनला न देण्याची कारणे काय आहे व बार असोसिएशन पदाधिकाऱ्यांशी उध्दटपणे वागणून करणाऱ्या जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०४-२०१६) :**(१) नाही, सन २०१५-१६ मध्ये १३ बार असोसिएशनच्या लायब्ररींकरीता प्रति लायब्ररी ५०,०००/- प्रमाणे एकूण ६,५०,०००/- इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे.
(२) (३) व (४) आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत, सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचनांनुसार, बार असोसिएशन लायब्ररीकरीता मंजूर निधी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्याकडे दिला जातो. सदर प्रकरणी, अमरावती डीस्ट्रीक्ट बार असोशिएशनचे पदाधिकारी यांनी, जिल्हा नियोजन अधिकारी अमरावती, यांच्याकडे विचारणा केली होती. त्यांचे समाधान न झाल्याने जिल्हा नियोजन अधिकारी अमरावती, यांच्याविरूध्द तक्रारीचे निवेदन जिल्हाधिकारी अमरावती यांना दिले. त्यासंदर्भात अप्पर जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिलेल्या चौकशी अहवालावरुन व नोंदविलेल्या मतानुसार, जिल्हा नियोजन अधिकारी, अमरावती, यांनी येणाऱ्या नागरिकांना सौजन्याची वागणूक द्यावी व लोकसेवकाच्या भावनेतून काम करावे अशी समज देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वर्धा जिल्हयातील जिल्हा वार्षिक योजनेकरीता अतिरिक्त निधी मंजूर करण्याबाबत**

**(४७) ५३१६६ (१४-०३-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्हा वार्षिक योजनेच्या प्रारुप आराखड्यातील २०१६-१७ या वर्षाकरीता १८८ कोटी ४५ लाख रुपयांची मागणी करण्यात आली त्यापैकी ८८ कोटी ४१ लाख मंजूर करण्यात आले असून पालक मंत्री यांनी १०० कोटीच्या अतिरिक्त निधीची मागणी केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने वर्धा जिल्हयातील जिल्हा वार्षिक योजनेकरीता अतिरिक्त १०० कोटीच्या मागणी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०४-२०१६) :**(१) व (२) वर्धा जिल्ह्याचा जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१६-१७ चा प्रारुप आराखडा तयार करण्याकरीता शासनाने तात्पुरत्या स्वरुपात रु. ८८.४१ कोटीची कमाल आर्थिक मर्यादा कळविली होती. सन २०१६-१७ चे जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेले प्रारुप आराखडे अंतिम करण्यासाठी मा.मंत्री (नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली विभागनिहाय राज्यस्तरीय बैठकांचे आयोजन करण्यात आले. दि. ८.०२.२०१६ रोजी राज्यस्तर बैठकीमध्ये वर्धा जिल्ह्याने उपरोक्त रु. ८८.४१ कोटीचा आराखड्याबरोबर रु. १०० कोटीच्या अतिरिक्त मागणीचा समावेश करुन रु. १८८.४५ कोटीच्या आराखड्याचे सादरीकरण केले. सदर सादरीकरण व त्यानुषंगाने केलेली वाढीव नियतव्ययाची मागणी विचारात घेऊन जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१६-१७ साठी वर्धा जिल्ह्यासाठी रु. १४३.०६ कोटी इतका नियतव्यव अंतिमत: मंजूर केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणघाट (जि.वर्धा) येथील लालनाला प्रकल्पात गेलेल्या जमिनीचा शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याबाबत**

**(४८) ५३३८१ (०३-०५-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट (जि.वर्धा) येथील लालनाला प्रकल्पात गेलेल्या अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीचा त्यांना अद्यापपर्यंत मोबदला मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०६-२०१६) :**(१) नाही.

लालनाला प्रकल्पाकरीता वर्धा जिल्हयातील समुद्रपूर तालुक्यातील १३४६.९३ हे. खाजगी जमीनीपैकी १३४२.६३ हे. जमीन संपादित करण्यात आलेली असून, त्यासाठीचा अंतिम निवाडयानुसार मोबदला रु. २६.२३ कोटी संबंधित भूसंपादन अधिकारी यांचेकडे देण्यात आलेला आहे. उर्वरित ४.३० हे. जमीनीचे भूसंपादन सरळ खरेदीने करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

भूसंपादन कायद्याचे कलम-१८ अंतर्गत दाखल केलेल्या एकूण १५१ एलएसी दिवाणी न्यायालयीन प्रकरणांपैकी न्यायालयीन निकालांप्रमाणे ८९ प्रकरणात रु. ४.३५ कोटी वाढीव मोबदला संबंधित भूधारकास न्यायालयामार्फत देण्यात आलेला आहे. ५५ न्यायालयीन प्रकरणात मा. दिवाणी न्यायालयाने दिलेल्या निकालाविरुध्द मा. उच्च न्यायालयात अपील करण्यात आल्यामुळे न्यायालयीन निर्देशा नुसार वाढीव मोबदला रु.२.५४ कोटी मा. उच्च न्यायालयात भरणा करण्यात आलेला आहे. ७ प्रकरणे मा. दिवाणी न्यायालयात सुरु असुन अद्याप निकाल लागलेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा नियोजन मंडळाकडे ग्रामीण रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता निधीची आर्थिक तरतूद करण्याबाबत**

**(४९) ५३३८८ (२८-०४-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांकरिता निधीचे वितरण जिल्हा नियोजन समितीमधून करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील रस्त्यांकरिता अत्यल्प प्रमाणात निधी देत असल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा नियोजन मंडळाकडे ग्रामीण रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) ते (४) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) मधील "ग्रामिण रस्ते विकास व मजबुतीकरण" या जिल्हास्तरीय योजनेच्या नवीन कामांसाठी जिल्हा नियोजन समितीकडून उपलब्ध निधीच्या मर्यादेत निधी दिला जातो. तसेच सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी ग्राम विकास विभागाकडून योजनेतर योजना (Non-Plan) निधी उपलब्ध निधीच्या मर्यादेत देण्यात येतो. ग्रामिण रस्ते दुरुस्तीसाठी मिळणारा निधी अत्यल्प ठरतो ही बाब खरी असली तरी ग्राम विकास विभागाने या प्रयोजनासाठी पुरेसा निधी देणे आवश्यक आहे.

तसेच जिल्हा वार्षिक योजनेतील "ग्रामिण रस्ते विकास व मजबुतीकरण" व "इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण" या जिल्हास्तरीय योजना संदर्भात भौगोलीक क्षेत्र, तालुका निहाय निधी वाटप इ. विविध बाबींच्या अनुषंगाने निकष, मार्गदर्शक सूचना या बाबत धोरणात्मक शासन निर्णय निर्गमित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कार्यरत असणाऱ्या ग्राम रोजगार सेवकांना ग्रामपंचायतमध्ये नियमित कर्मचाऱ्याप्रमाणे सामावून घेण्याबाबत**

**(५०) ५३४२१ (२८-०४-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कार्यरत असणाऱ्या ग्राम रोजगार सेवकांना किमान वेतन देवुन ग्रामपंचायतीमध्ये नियमित कर्मचाऱ्याप्रमाणे सामावून घेण्याबाबत माहे फेब्रुवारी, २०१६ च्या तिसऱ्या आठवडयात शासनाकडे निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्राम रोजगार सेवकांना किमान वेतनाच्या आधारावर मानधन देण्याबाबतची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०६-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
(३) व (४) ग्राम रोजगार सेवकांचे मानधन दिनांक १/३/२०१४ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत करण्यात आले असून, ते पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वार्षिक मनुष्य दिवस | अकुशल खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | १००० मनुष्य दिनापर्यंत | ६% |
| २ | १००१-२००० मनुष्य दिवस | |
| | अ) पहिल्या १००० मनुष्य दिवसांसाठी | ६% |
| | ब) १००१-२००० मनुष्य दिवसपर्यंत | ४% |
| ३ | २००० पेक्षा अधिक मनुष्य दिवस | |
| | अ) पहिल्या १००० मनुष्य दिवसांसाठी | ६% |
| | ब) १००१-२००० मनुष्य दिवसपर्यंत | ४% |
| | क) २००१ मनुष्य दिवसांनंतर | २.२५% |

सदरचे मानधन झालेल्या कामावरील मजुरीच्या खर्चावर आधारित असल्याने, ग्रामपंचायत व यंत्रणेमध्ये मजुरीवर होणाऱ्या खर्चाच्या प्रमाणात ग्राम रोजगार सेवकांच्या मानधनात वाढ होत असते. योजनेच्या कामाचे स्वरुप पाहता ग्राम रोजगार सेवकांचे काम अर्ध वेळ स्वरुपाचे आहे आणि त्यांना इतर कामे करण्याचीही मुभा आहे. त्यामुळे त्यांना दरमहा मानधन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाने मागील दराने (Back Door) भरती करण्यात येऊ नये या दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १९/११/२००३ व दिनांक २५/०८/२००५ च्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने ग्राम रोजगार सेवकांना शासन सेवेत सामावून घेता येणार नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.